खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे

# हुतात्मा राजगुरू महाविद्यालय

राजगुरुनगर, ता. खेड, जि. पुणे

## प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष : २०२३–२४

### साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमाला – डॉ. इंद्रजित भालेराव

प्रभात

# कुणब्याच्या पोरा आता लढायला शिक - भालेराव

## राजगुरूनगरात गावाकडे चल माझ्या दोस्ता या विषयावर मांडली बळीराजाची व्यथा

**राजगुरूनगर, दि. ४ (प्रतिनिधी) -** शेतकरी



आत्मविश्वासाने जगला पाहिजे, कठीण परिस्थितीतही तो संकटांना तोंड देत उभा राहिला पाहिजे. यासाठी शेतकऱ्यांना जगण्याचे बळ देण्याची गरज असून माझ्या कविता शेतकऱ्यांच्या व्यथा सांगणाऱ्या, त्यांचे आत्मबळ वाढविणाऱ्या आहेत. त्यांनी आत्महत्या करू नये यासाठी कुणब्याच्या पोरा आता लढायला शिक असा संदेश देणाऱ्या असल्याचे प्रतिपादन कृषी संस्कृतीचे लोककवी इंद्रजीत भालेराव यांनी केले.

हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळ आयोजित साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमालेत गावाकडे चल माझ्या दोस्ता या विषयावर बोलत होते. या प्रसंगी संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, प्रदेश राष्ट्रवादी काँग्रेसच्या महिला उपाध्यक्षा ॲड. राजमाला बुट्टे पाटील, संस्था संचालक बाळासाहेब सांडभोर, हिरामण सातकर प्राचार्य डॉ. एस. एस. पिंगळे, डॉ. एच. एम. जरे, प्रबंधक के. आर. पाचारणे आणि विद्यार्थी, पालक, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

इंद्रजीत भालेराव पुढे म्हणाले, शेतकऱ्यांच्या वेदना देशव्यापी असून शेतात राबणार्या हातांनी आता शोषण करणाऱ्या व्यवस्थेविरुद्ध दोन हात करायला शिकले पाहिजे. आताच्या कवींनी शेतकर्याला शृंगाराचा आणि विनोदाचा विषय केले असून महात्मा फुले यांच्या लेखनात आलेला शेतकरी अजूनही कवितेतून व्यक्त होत नाही, अशी खंत त्यांनी व्यक्त केली. शिक्षण क्षेत्रातील बदलत्या परिस्थितीवरही प्रकाश टाकून विद्यार्थ्यांनी परिस्थितीनुरूप बदलायला हवे, असे सांगितले. साहेबराव बुट्टे पाटील यांच्या कार्याचा गौरव करताना त्यांच्या आयुष्याचा केंद्रबिंदू शेतकरी होता, असे सांगितले.

भालेराव यांनी बाप, गावाकडे चल माझ्या दोस्ता, शिक बाबा शिक लढायला शिक, जिजाऊ या कविता सादर करून विद्यार्थी श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. विद्यार्थ्यांनीही तालात आणि ठेक्यात टाळ्या वाजवून त्यांना उत्स्फूर्त दाद दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. ज्योती वाळुंज यांनी, परिचय प्रा. मयुरी मांजरे यांनी तर प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे यांनी आभार मानले.

PuneDistrict, 05 Feb 2024, Page:013
https://epaper.dainikprabhat.com

केसरी

# शेतकऱ्यांना जगण्याचे बळ देण्याची गरज : भालेराव



**राजगुरुनगर,** (वार्ताहर) : शेतकरी आत्मविश्वासाने जगला पाहिजे, कठीण परिस्थितीतही तो संकटांना तोंड देत उभा राहिला पाहिजे, यासाठी शेतकऱ्यांना जगण्याचे बळ देण्याची गरज असून, माझ्या कविता शेतकऱ्यांच्या व्यथा सांगणाऱ्या, त्यांचे आत्मबळ वाढविणाऱ्या असल्याचे कृषीसंस्कृतीचे लोककवी इंद्रजीत भालेराव यांनी सांगितले.

हुतात्मा राजगुरु महाविद्यालयात खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळ आयोजित साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमालेत 'गावाकडे चल माझ्या दोस्ता' या विषयावर भालेराव बोलत होते. यावेळी संस्थाध्यक्ष देवेंद्र बुट्टे पाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, राजमाला बुट्टे पाटील, बाळासाहेब सांडभोर, हिरामण सातकर, प्राचार्य डॉ. एस. एस. पिंगळे, डॉ. एच. एम. जरे, प्रबंधक के.आर. पाचारणे आणि विद्यार्थी, पालक, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

भालेराव म्हणाले, शेतकऱ्यांच्या वेदना देशव्यापी असून, शेतात राबणाऱ्या हातांनी आता शोषण करणाऱ्या व्यवस्थेविरुद्ध दोन हात करायला शिकले पाहिजे. आताच्या कवींनी शेतकऱ्याला शृंगाराचा आणि विनोदाचा विषय केले असून महात्मा फुले यांच्या लेखनात आलेला शेतकरी अजूनही कवितेतून व्यक्त होत नाही, अशी खंत त्यांनी व्यक्त केली. शिक्षण क्षेत्रातील बदलत्या परिस्थितीवरही प्रकाश टाकून विद्यार्थ्यांनी परिस्थितीनुरूप बदलायला हवे, असे सांगितले. साहेबराव बुट्टे पाटील यांच्या कार्याचा गौरव करताना त्यांच्या आयुष्याचा केंद्रबिंदू शेतकरी होता, असे त्यांनी सांगितले. भालेराव यांनी बाप, गावाकडे चल माझ्या दोस्ता, शिक बाबा शिक – लढायला शिक, जिजाऊ या कविता सादर करून विद्यार्थी श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. विद्यार्थ्यांनीही तालात आणि ठेक्यात टाळ्या वाजवून त्यांना उत्स्फूर्त दाद दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. ज्योती वाळुंज यांनी, परिचय प्रा. मयुरी मांजरे यांनी तर आभार प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे यांनी मानले.

लोकमत

राजगुरु महाविद्यालयात साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमाला उत्साहात

# शेतकऱ्यांना जगण्याचे बळ देण्याची गरज : भालेराव

लोकमत न्यूज नेटवर्क

**राजगुरूनगर :** शेतकरी आत्मविश्वासाने जगला पाहिजे, कठीण परिस्थितीतही तो संकटांना तोंड देत उभा राहिला पाहिजे. यासाठी शेतकऱ्यांना जगण्याचे बळ देण्याची गरज असून माझ्या कविता शेतकऱ्यांच्या व्यथा सांगणाऱ्या, त्यांचे आत्मबळ वाढविणाऱ्या आणि त्यांनी आत्महत्या करू नये यासाठी 'कुणब्याच्या पोरा आता लढाईला शिक,' असा संदेश देणाऱ्या असल्याचे प्रतिपादन कृषीसंस्कृतीचे लोककवी इंद्रजित भालेराव यांनी केले.



हुतात्मा राजगुरु महाविद्यालयात साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमाला उत्साहात पार पडली.

हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळ आयोजित साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमालेत 'गावाकडे चल माझ्या दोस्ता' या विषयावर बोलत होते. याप्रसंगी संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, राष्ट्रवादी महिला उपाध्यक्षा ॲड. राजमाला बुट्टे पाटील, संचालक बाळासाहेब सांडभोर, हिरामण सातकर, प्राचार्य डॉ. एस. एस. पिंगळे, डॉ. एच. एम. जरे, प्रबंधक के. आर. पाचारणे उपस्थित होते.

शेतकऱ्यांच्या वेदना देशव्यापी असून शेतात राबणाऱ्या हातांनी आता शोषण करणाऱ्या व्यवस्थेविरुद्ध दोन हात करायला शिकले पाहिजे. महात्मा फुले यांच्या लेखनात आलेला शेतकरी अजूनही कवितेतून व्यक्त होत नाही, अशी खंत व्यक्त केली.

सूत्रसंचालन प्रा. ज्योती वाळुंज यांनी केले, परिचय प्रा. मयुरी मांजरे यांनी करून दिला, आभार प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे यांनी मानले.

## विद्यार्थी मंत्रमुग्ध

शिक्षण क्षेत्रातील बदलत्या परिस्थितीवरही प्रकाश टाकून विद्यार्थ्यांनी परिस्थितीनुरुप बदलायला हवे, असे सांगितले. साहेबराव बुट्टे पाटील यांच्या कार्याचा गौरव करताना त्यांच्या आयुष्याचा केंद्रबिंदू शेतकरी होता, असे सांगितले.
भालेराव यांनी बाप, गावाकडे चल माझ्या दोस्ता, शिक बाबा शिक लढायला शिक, जिजाऊ या कविता सादर करून विद्यार्थी श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. विद्यार्थ्यांनीही तालात आणि ठेक्यात टाळ्या वाजवून त्यांना उत्स्फूर्त दाद दिली.
यावेळी परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

Hello Pune Gramin
Page No. 6 Feb 04, 2024
Powered by: erelego.com



## शेतकऱ्यांना जगण्याचे बळ देण्याची गरज : इंद्रजीत भालेराव

**समर्थ भारत वृत्तसेवा**

**राजगुरुनगर ता. ४ :** शेतकरी आत्मविश्वासाने जगला पाहिजे, कठीण परिस्थितीतही तो संकटांना तोंड देत उभा राहिला पाहिजे, यासाठी शेतकऱ्यांना जगण्याचे बळ देण्याची गरज असून माझ्या कविता शेतकऱ्यांच्या व्यथा सांगणाऱ्या, त्यांचे आत्मबळ वाढविणाऱ्या आणि त्यांनी आत्महत्या करू नये यासाठी कुणब्याच्या पोरा आता लढाईला शिक असा संदेश देणाऱ्या असल्याचे प्रतिपादन कृषीसंस्कृतीचे लोककवी इंद्रजीत भालेराव यांनी केले.

हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळ आयोजित साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमालेत 'गावाकडे चल माझ्या दोस्ता'या विषयावर बोलत होते. या प्रसंगी संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, प्रदेश राष्ट्रवादी काँग्रेसच्या महिला उपाध्यक्षा ॲड. राजमाला बुट्टे पाटील, संस्था संचालक बाळासाहेब सांडभोर, हिरामण सातकर प्राचार्य डॉ. एस.एस.पिंगळे, डॉ. एच.एम.जरे, प्रबंधक के.आर. पाचारणे आणि विद्यार्थी, पालक, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

इंद्रजीत भालेराव पुढे म्हणाले की शेतकऱ्यांच्या वेदना देशव्यापी असून शेतात राबणाऱ्या हातांनी आता शोषण करणाऱ्या व्यवस्थेविरुद्ध दोन हात करायला शिकले पाहिजे. आताच्या कवींनी शेतकऱ्याला शृंगाराचा आणि विनोदाचा विषय केले असून महात्मा फुले यांच्या लेखनात आलेला शेतकरी अजूनही कवितेतून व्यक्त होत नाही,अशी खंत त्यांनी व्यक्त केली.

शिक्षण क्षेत्रातील बदलत्या परिस्थितीवरही प्रकाश टाकून विद्यार्थ्यांनी परिस्थितीनुरूप बदलायला हवे, असे सांगितले. साहेबराव बुट्टे पाटील यांच्या कार्याचा गौरव करताना त्यांच्या आयुष्याचा केंद्रबिंदू शेतकरी होता, असे सांगितले. भालेराव यांनी बाप, गावाकडे चल माझ्या दोस्ता, शिक बाबा शिक लढायला शिक, जिजाऊ या कविता सादर करून विद्यार्थी श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. विद्यार्थ्यांनीही तालात आणि ठेक्यात टाळ्या वाजवून त्यांना उत्स्फूर्त दाद दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.ज्योती वाळुंज यांनी, परिचय प्रा. मयुरी मांजरे यांनी तर आभार प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे यांनी मानले.

दैनिक आरंभपर्व
03 Feb 2024 - Page 2

# शेतकऱ्यांना जगण्याचे बळ देण्याची गरज : इंद्रजीत भालेराव

**राजगुरूनगर (दै. आरंभ पर्व)**
शेतकरी आत्मविश्वासाने जगला पाहिजे, कठीण परिस्थितीतही तो संकटांना तोंड देत उभा राहिला पाहिजे, यासाठी शेतकऱ्यांना जगण्याचे बळ देण्याची गरज असून माझ्या कविता शेतकऱ्यांच्या व्यथा सांगणाऱ्या, त्यांचे आत्मबळ वाढविणाऱ्या आणि त्यांनी आत्महत्या करू नये यासाठी 'कुणब्याच्या पोरा आता लढायला शिक' असा संदेश देणाऱ्या असल्याचे प्रतिपादन कृषीसंस्कृतीचे लोककवी इंद्रजीत भालेराव यांनी केले. ते हुतात्मा राजगुरु महाविद्यालयात खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळ आयोजित साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमालेत 'गावाकडे चल माझ्या दोस्ता' या विषयावर बोलत होते.

या प्रसंगी संस्थाध्यक्ष अॅड. देवेंद्र बुट्टे पाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, प्रदेश राष्ट्रवादी काँग्रेसच्या महिला उपाध्यक्षा अॅड. राजमाला बुट्टे पाटील, संस्था संचालक बाळासाहेब सांडभोर, हिरामण सातकर प्राचार्य डॉ. एस.एस.पिंगळे, डॉ.एच. एम.जरे, प्रबंधक के.आर. पाचारणे आणि विद्यार्थी, पालक, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



• राजगुरूनगर येथे हुतात्मा राजगुरु महाविद्यालयात आयोजित साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमालेत बोलताना कृषीसंस्कृतीचे लोककवी इंद्रजीत भालेराव. (छायाचित्र : किरण खुडे, राजगुरुनगर) •

इंद्रजीत भालेराव पुढे म्हणाले की, शेतकऱ्यांच्या वेदना देशव्यापी असून शेतात राबणाऱ्या हातांनी आता शोषण करणाऱ्या व्यवस्थेविरुद्ध दोन हात करायला शिकले पाहिजे. आताच्या कवींनी शेतकऱ्याला शृंगाराचा आणि विनोदाचा विषय केले असून महात्मा फुले यांच्या लेखनात आलेला शेतकरी अजूनही कवितेतून व्यक्त होत नाही,अशी खंत त्यांनी व्यक्त केली.

शिक्षण क्षेत्रातील बदलत्या परिस्थितीवरही प्रकाश टाकून विद्यार्थ्यांनी परिस्थितीनुरूप बदलायला हवे, असे सांगितले. साहेबराव बुट्टे पाटील यांच्या कार्याचा गौरव करताना त्यांच्या आयुष्याचा केंद्रबिंदू शेतकरी होता, असे त्यांनी सांगितले.

भालेराव यांनी बाप, गावाकडे चल माझ्या दोस्ता, शिक बाबा शिक - लढायला शिक, जिजाऊ या कविता सादर करून विद्यार्थी श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. विद्यार्थ्यांनीही तालात आणि ठेक्यात टाळ्या वाजवून त्यांना उत्स्फूर्त दाद दिली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. ज्योती वाळुंज यांनी, परिचय प्रा. मयुरी मांजरे यांनी तर आभार प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे यांनी मानले.

**डॉ. संजय शिंदे**
**प्रसिद्धी विभागप्रमुख**